## Boys Hostel Committee

1. **Mr. Sarveshwar Kasarla (Warden)**
2. **Mr. K. P. Mane**
3. **Dr. M. Y. Salunkhe**
4. **Dr. Surajsingh Yeotikar**
5. **Mr. Balu Navale**
6. **Mr. R. S. Shinde**

## Girls Hostel Committee

1. **Smt. S. P. Deshmukh (Warden)**
2. **Dr. Aruna Kawadkar**
3. **Dr. J. S. Mhaske**

**ग्रंथालयाचे नियम** (Rules for Library)

(१) विज्ञान संस्थेत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला ग्रंथालयाचा सभासद होणे अनिवार्य आहे.

(२) संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले नाव ग्रंथालयात नोंद करणे आवश्यक आहे त्याशिवाय त्यांना ग्रंथालयात बसता येणार नाही. तसेच पुस्तकांची देवाण-घेवाण करता येणार नाही.

(३) एखाद्या वाचकाकडून ग्रंथ हरविल्यास नवीन ग्रंथ आणून द्यावा लागेल. काही तांत्रिक अडचणीमुळे ग्रंथ उपलब्ध नसल्यास त्याला सदर पुस्तकाच्या सध्याच्या किंमतीच्या दुप्पट रक्कम भरावी लागेल.

(४) ग्रंथ परत करण्यास विलंब लागल्यास प्रत्येक दिवसाला, प्रत्येक पुस्तकाला २ रु. आकारण्यात येईल.

(५) विद्यार्थ्यांना आपल्या नावावरील ग्रंथ परस्पर दुसऱ्याच्या नावावर हस्तांतरित करता येणार नाही.

(६) विद्यार्थ्यांचे ग्रंथ नोंदणीपत्रक हरविल्यास १० रुपये (दहा रुपये) भरून नवीनग्रंथ नोंदणीपत्रक प्राप्त करता येईल.

**१२. वसतिगृह सुविधा :**

संस्थेत मुलांचे/मुलींचे स्वतंत्र वसतिगृह असून वसतिगृहांची क्षमता खालीलप्रमाणे आहे :-

वसतिगृह (मुले) - ८०

वसतिगृह (मुली) - ६०

**वसतिगृहात प्रवेशाबाबतची नियमावली** (Rules for Hostel Admission) :

(१) संस्थेचे शैक्षणिक वर्ष सुरू होताच वसतिगृहे उघडली जातात.

(२) **प्रवेश :-**

(१) वसतिगृहात प्रवेश मिळण्याकरिता विहित केलेल्या नमुन्यातच अर्ज केला पाहिजे. हा अर्ज कार्यालयात मागणी केल्यास रु. १० शुल्क भरून मिळू शकेल.

(२) संस्थेतील प्रवेशानंतरच वसतिगृहात प्रवेश दिला जाईल.

(३) वसतिगृह प्रवेशासाठी विद्यार्थी स्थानिक नसावा.

(४) विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर वसतिगृहात प्रवेश दिला जाईल. मर्यादित जागांमुळे महाविद्यालयात प्रवेश मिळाला म्हणजे

वसतिगृहात प्रवेश मिळालाच पाहिजे असे नाही.

(५) वसतिगृहात फक्त एका शैक्षणिक वर्षासाठीच प्रवेश देण्यात येतो. पुन:प्रवेशाकरिता प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस नवा अर्ज निकाल लागल्यापासून १० दिवसांचे आत करावा लागेल.

(६) अनुत्तीर्ण/ए.टी.के.टी. असलेल्या विद्यार्थांना वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही.

(७) वसतिगृहाच्या नियमांचा व शिस्तीचा भंग केल्यास, विद्यार्थ्यास केव्हाही वसतिगृहातून काढून टाकण्यात येईल.

(८) वसतिगृहात प्रवेश घेतल्याचा तारखेनंतर एक महिन्याच्या आत वसतिगृहात दाखल झाले पाहिजे. अन्यथा प्रवेश रद्द केला जाईल. तसेच प्रवेश घेतल्यापासून सर्व शुल्क लागू होतील.

(९) विद्यार्थ्याची/विद्यार्थिनीची प्रथम सत्रातील महाविद्यालयातील उपस्थिती ७५% पेक्षा कमी असल्यास त्याचा/तिचा वसतिगृहातील प्रवेश रद्द करण्यात येईल.

(१०) वसतिगृहात दाखल झाल्यानंतर अधीक्षकांच्या/ व्यवस्थापिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणी विद्यार्थी/विद्यार्थीनी सतत ३० दवस गैरहजर राहिल्यास, त्याला/तिला वसतिगृहातून काढून टाकण्यात येईल.

(११) विद्यार्थ्याला महाविद्यालय सत्राच्या मध्येच सोडावयाचे असेल तरी त्याला पूर्ण सत्राचे वसतिगृह शुल्क द्यावे लागेल.

(१२) वसतिगृहामध्ये प्रवेशाबाबत अंतिम निर्णय संचालक, विज्ञान संस्था, नागपूर ह्यांचा राहील.

**विद्यार्थिनी वसतिगृहातील नियमावली**

(१) विद्यार्थिनी वसतिगृह ईमारत / परिसरामध्ये पुरुषांना प्रवेश करता येणार नाही.

(२) विद्यार्थिनीचे पालक / स्थानिक पालक, नातेवाईकांना वसतिगृह अधिक्षकाच्या पूर्वपरवानगीने प्रवेशद्वारा बाहेरच बोलता / भेटता येईल.

(३) विद्यार्थिनींना भेटण्याकरीता आलेले पालक / नातेवाईक / मैत्रीणी यांना वसतिगृह इमारतीमध्ये प्रवेश करता येणार नाही. त्याच प्रमाणे विद्यार्थिनीच्या खोल्यामध्ये वास्तव्य करता येणार नाही.

(४) वसतिगृह अधिक्षीका यांच्या पूर्वपरवानगी शिवाय विद्यार्थिनींना सायंकाळी ७.०० नंतर वसतिगृहाबाहेर जाता येणार नाही.

(५) विद्यार्थिनींना सुट्टीकरीता आपल्या घरी किंवा नातेवाईकाकडे



जायचे असल्यास वसतिगृह अधिक्षीकांकडे लेखी अर्ज करुन परवानगी घेवून जाता येईल. वसतिगृहातील विद्यार्थिनी वसतिगृह अधिक्षीकांच्या पूर्वपरवानगी शिवाय १५ दिवसापेक्षा जास्त कालावधी पर्यन्त वसतिगृहामध्ये अनुपस्थित राहिल्यास पालकांनी समक्ष भेटून खुलासा करुन लेखी विनंती केल्यानंतरच वसतिगृहामध्ये दाखल करुन घेता येईल. अन्यथा वसतिगृह प्रवेश आपोआप रद्द होईल.

(६) विद्यार्थिनींनी वसतिगृहामध्ये शिस्त पाळावी भांडण / तंटा / हेवेदावे न करता एकमेकाशी सौजन्याची वर्तणूक ठेवून वसतिगृहातील वातावरण मैत्रीपूर्ण व खेळीमेळीचे राहील याची दक्षता घ्यावी.

(७) विद्यार्थिनींनी आपले राहणीमान स्वच्छ व नीटनेटके ठेवावेत. आपली खोली व वसतिगृहाचा परिसर स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी.

(८) वसतिगृहातील विद्यार्थिनींची प्रकृती ठीक नसल्यास किंवा आजारी असल्यास तात्काळ अधिक्षीका / प्रभारी अधिक्षीका यांना कळविण्यात यावे.

(९) वसतिगृहातील विद्यार्थिनींनी आपल्या जवळील रक्कम, मोबाईल व इतर मौल्यवान वस्तु स्वत:च्या जबाबदारीवर ठेवाव्यांत. वस्तु हरविल्यास किंवा चोरी झाल्यास वसतिगृह जबाबदार राहणार नाही.

(१०) वसतिगृहातील विद्यार्थिनींनी विद्यार्थी संघटना वगळता अन्य कोणत्याही राजकीय पक्षाचे किंवा संघटनेचे सभासद होता कामा नये त्याच प्रमाणे राजकीय पक्षांच्या सभेमध्ये सहभाग घेवू नये.

(११) विद्यार्थिनींना भोजनाकरीता वसतिगृह इमारतीमध्ये मेस सुविधा उपलब्ध आहे. वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनींना वसतिगृहातील मेसमध्येच भोजन घेणे बंधनकारक राहील. वसतिगृहातील विद्यार्थिनींना बाहेरील जेवणाचे डबे वसतिगृहामध्ये आणता येणार नाहीत.

(१२) वसतिगृहातील विद्यार्थिनींनी भोजनावेळी शांतता व शिस्त पाळावी.

(१३) वसतिगृहातील विद्यार्थिनींनी स्नानगृहामध्ये तसेच इतरत्र खरकटे व कचरा टाकू नये घाणीमुळे साथीच्या रोगांना प्रादुर्भाव होत असल्याने वसतिगृह परिसर स्वच्छ राही याची दक्षता घ्यावी.

(१४) विद्यार्थिनींनी महाविद्यालयामध्ये नियमित उपस्थित राहून थिअरी / प्रॅक्टीकल पूर्ण करावे.

(१५) या शासकीय संस्थेचे वसतिगृह हे बाहेरील खेड्यातील ज्या मुलींना शहरामध्ये नातेवाईक नसल्यामुळे राहण्याची सोय नसल्यामुळे गैरसोईमुळे त्यांना शिक्षणापासुन वंचित राहणे लागु नये त्यांची सोय व्हावी या हेतुने उपलब्ध करूण दिलेली सुविधा आहे. खेडयातील मुलीना त्यांचे ध्येय साध्य करण्याकरीता हि संधी आहे. विद्यार्थिनींनी याचा फायदा घेवुन आपले ध्येय साध्य करण्याकरीता प्रयत्नशिल राहावे.

(१६) हे वसतिगृह ही शासकीय संस्था आहे या वसतिगृहामध्ये सर्व जातिधर्माच्या मुली वास्तव्य करीत असल्याने भेदभाव न करता सर्व धर्म समभाव या उक्तीनुसार वसतिगृहातील विद्यार्थिनींनी आचरण करावे. वसतिगृह ईमारत / परिसरामध्ये कोणतेही धार्मिक विधी / पूजा / प्रार्थना घेण्यास प्रतिबंध आहे.

(१७) विद्यार्थिनींना वसतिगृहातील वरील सर्व नियम काटेकोरपणे पाळणे बंधनकारक राहील. ज्या विद्यार्थिनीं या नियमाचे पालन करणार नाही किंवा उल्लंघन करुन गैर वर्तन करतील त्यांचे पालकांना बोलावुन विद्यार्थिनींच्या गैरवर्तणुकीबाबत अवगत करण्यात येईल.

(१८) वसतिगृहातील ईमारत / परिसरामध्ये रॅगींग व रॅगींग सदृष्य कृती करणे महाराष्ट्र रॅगींग अधिनियम १९९९ नुसार गुन्हा आहे. रॅगींग किंवा रॅगींग सदृष्य कृती करणाऱ्या विद्यार्थिनीबाबत सदरहू अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(१९) विद्यार्थिनींनी वसतिगृहातील असुविधेबाबत किंवा अन्य तक्रारी वसतीगृहामध्ये उपलब्ध तक्रार पुस्तिकेमध्ये नोंद कराव्यात त्याचप्रमाणे वसतीगृह अधीक्षिका / प्रभारी यांचेकडे करण्यात आलेल्या तक्रारीची दखल वसतीगृह अधिक्षक / प्रभारी अधिक्षीका यांनी न घेतल्यास या संस्थेकडे कळविण्यात यावे.

## (३) **वसतिगृह शुल्क** (Hostel Fees)

(१) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण सेवायोजना विभाग, शासन निर्णय क्र. जी.सी.एच./१०९२-(९९)/विशि-५, दिनांक २ जून १९९२ च्या अन्वये वसतिगृहाच्या शुल्काचे दर निर्धारित करण्यात आले आहेत. तथापि, शासनाने वसतिगृहाच्या शुल्कात वाढ केल्यास, ती विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

वसतिगृहात प्रवेश मिळाल्याबरोबर प्रत्येक विद्यार्थ्याला पुढील शुल्क वर्गण्या/खोलीभाडे तारणधन संस्थेच्या कार्यालयात भरावे लागेल.



### **शुल्क तक्ता** (Fee Chart)

| | | रुपये |
|---|---|---|
| (अ) | वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश शुल्क | ५० |
| (ब) | वसतिगृहाचे खोलीभाडे पूर्ण सत्रासाठी एक रकमी | १,००० |
| (क) | वसतिगृहात पूर्ण सत्रासाठी वीज आकार | ७५० |
| (ड) | वसतिगृहात पूर्ण सत्रासाठी पाणी आकार | २५० |
| (इ) | करमणूक कक्षातील खेळाचे सामान, वृत्तपत्रे | १५० |
| (ई) | भोजनातील भांडे शुल्क वार्षिक | ५० |
| (फ) | सरकारी मालाची तुटफूट वा नुकसान भरपाई शुल्क | ५० |
| (ग) | वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरिता लागणाऱ्या इतर खर्चासाठी | २०० |
| (ह) | तारणधन | १०० |
| | एकूण .. | २,६००/- |

**टीप :** (१) सदर शुल्क एकरकमी भरणे आवश्यक आहे. त्यात विद्यार्थ्यास सुट दिली जाणार नाही.

(२) भारत सरकारची शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना खोलीभाडे भरण्याची गरज नाही.

## **(४) सर्वसाधारण नियम (General Rules) :**

(१) वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांकरिता आवश्यक ते फर्निचर, पाणीपुरवठा, झाडलोट इत्यादि व्यवस्था असते. विजेच्या बल्बचा खर्च विद्यार्थ्यांना स्वत: करावा लागेल.

(२) वसतिगृहात राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला वसतिगृहातील भोजनगृहातच जेवण घेणे अनिवार्य राहील. तसेच भोजनखर्च प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला आगाऊ द्यावा लागेल.

(३) भोजनखर्च विद्यार्थ्यांना स्वत:च द्यावा लागेल व भोजनगृहाच्या कंत्राटदाराकडे जमा करावे लागेल. तसे न केल्यास पुढील प्रत्येक दिवशी रु. १० प्रमाणे दंड लावल्या जाईल.

(४) विद्यार्थ्यांना स्वत:ची मच्छरदाणी, लहान बादली व बिछाना आणावा लागेल.

(५) रात्री आठ नंतर योग्य अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांनी वसतिगृहाच्या बाहेर राहता कामा नये.

(६) विजेच्या दिव्याखेरीज अधिक दिवे लावणे, विजेच्या उपकरणात काढ-घाल करणे अगर विजेची शेगडी, इस्तरी वापरणे यांना सक्त मनाई आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास जबर दंड करण्यात येईल.

(७) वसतिगृहात राहत असतांना विद्यार्थ्यांनी कुठल्याही मौल्यवान वस्तू जवळ बाळगू नयेत. बाळगल्यास, त्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यांची राहील.

(८) खोलीतील व भोजनगृहातील सामान, दारे व खिडक्यांची तावदाने इत्यादी सरकारी मालाची नासधूस झाली व ते हरवले तर त्याची संयुक्त व वैयक्तिक जबाबदारी वसतिगृहात राहणाऱ्या प्रत्येकावर राहील.

(९) वसतिगृहात गैरहजर राहावयाचे असल्यास, विद्यार्थ्यांनी अधीक्षक/अधीक्षिका यांचेकडे लेखी अर्ज केला पाहिजे.

(१०) संस्था चालू असेल त्या दिवशी विद्यार्थ्यांना पूर्वपरवानगीशिवाय वसतिगृह सोडून जाता येणार नाही.

(११) विद्यार्थिनींना आई-वडील-पालक यांची सही असलेली मान्यताप्राप्त व्यक्तींची नावे (वसतिगृहात प्रवेश घेतांना) द्यावी लागेल. या यादीतील व्यक्तींनाच वसतिगृहातील विद्यार्थिनींना ठराविक वेळात भेटता येईल किंवा प्रसंगविशेषी त्यांचेकडेच गावात राहण्याची त्यांना परवानगी मिळू शकेल. अशाप्रकारच्या यादीच्या अभावी विद्यार्थिनीला वसतिगृहात कोणालाही भेटता येणार नाही किंवा गावात कोणाकडे जाऊन राहता येणार नाही.

संशोधनासाठी प्रवेश प्राप्त विद्यार्थी, तीन वर्ष वसतिगृहात राहू शकतात. परंतु त्यांनी दरवर्षी प्रवेश घेणे आवश्यक आहे.

(i) कोणत्याही विद्यार्थिनीला गावातील आपल्या नातेवाईकांकडे राहावयास जावयाचे असेल तर त्या नातेवाईकाने स्वत:च्या जबाबदारीवर विद्यार्थिनीला आपल्याकडे घेऊन जावे आणि स्वत: आपल्याबरोबर तिला वसतिगृहात पोहचवून द्यावे.

(ii) परवानगीनुसार आपल्या आई/वडील/पालकांकडे राहावयास गेलेल्या विद्यार्थिनीने वसतिगृहात परत येते वेळी आपल्या आईचे/वडिलाचे-पालकांचे पत्र घेऊन येणे आवश्यक आहे.

(१२) पालकांना लेखी सूचना दिल्यानंतर त्यांनी त्यांची दखल घेऊन या संदर्भात अधीक्षक/अधीक्षिका यांना त्वरीत भेटणे आवश्यक आहे. याबातीत त्यांच्याकडून निष्काळजीपणा झाल्यास,



होणाऱ्या परिणामाची संपूर्ण जबाबदारी पालकांवरच राहील.

(१३) याखरीज इतर नियम करणे अधिकाऱ्यांच्या अधीन आहे. हे सर्व विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. नियमांचे उल्लंघन केल्यास विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.

(१४) **रॅगिंग करणे हा गुन्हा आहे. तसे आढळल्यास, संबंधित विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल. रॅगिंग करताना आढळल्यास विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल व त्याचा संस्थेतील तसेच वसतिगृहातील प्रवेश रद्द केला जाईल.**

(१५) वसतगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या खोलीत आगंतुक व्यक्ती रात्री मुक्कामासाठी आढळल्यास रुपये १०० दंड केल्या जाईल.

ह्या व्यतिरिक्त मुलांच्या / मुलींच्या वसतिगृहाच्या स्वतंत्र नियमांचे पालन करणे त्यांना अनिवार्य असेल.

**१३. ओळखपत्र व ग्रंथ नोंदणीपत्र** (Identity Card and Library Card):

(१) बी.एस्सी. भाग-१ व एम.एस्सी. भाग-१ मध्ये प्रवेश घेतल्यानंतर किंवा विज्ञान संस्थेत इतर कुठल्याही वर्षाला प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश शुल्क भरल्याची पावती प्रबंधकांना दाखवून संस्थेचे ओळखपत्र व ग्रंथ नोंदणीपत्र त्वरीत तयार करावे.

(२) ओळखपत्र, ग्रंथ नोंदणीपत्र परत केल्याशिवाय संस्थेतील प्रवेश रद्द केला जाणार नाही.

(३) नवीन ओळखपत्र घेतेवेळी जुने ओळखपत्र कार्यालयात जमा करावे लागेल.

**१४. सामान्य शिस्त नियम** (General Discipline) :

(१) संस्थेच्या संग्रहालयात व भंडारात विद्यार्थ्यांना जाण्यास सक्त मनाई आहे. आवश्यक उपकरणे, यंत्रसामग्री, रसायने इ. साहित्य प्रयोगशाळा कर्मचारी आणून देतील.

(२) वैज्ञानिक प्रयोग साहित्य व उपकरणांच्या मोडतोडीस विद्यार्थी सर्वस्वी जबाबदार राहील व त्यास त्याची संपूर्ण नुकसान भरपाई द्यावी लागेल. वैज्ञानिक प्रयोग शाळेतील साहित्य व उपकरणांचे किरकोळ नुकसान भरून काढण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याकडून नाममात्र शुल्क घेतले जाईल.

(३) संस्थेच्या परिसरात वावरतांना प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:जवळ त्याला दिलेले ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे. नसल्यास, त्याचेविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

(४) प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता वेगळे ओळखपत्र देण्यात येईल.

(५) ओळखपत्र हरविल्यास रु. २५ शुल्क भरून नवीन ओळखपत्र घ्यावे लागेल.

(६) विद्यार्थ्यांनी व संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आपली वाहने संस्थेच्या अधिकृत स्टँडवर ठेवावीत. ठेकेदाराकडून त्याकरिता रोज बिल्ल घ्यावा. संस्थेच्या आवारात इतरत्र वाहने ठेवण्यास सक्त मनाई आहे. इतरत्र ठेवलेल्या वाहनांच्या नुकसानीच वा चोरीस वाहन मालक संपूर्णत: जबाबदार राहील.

(७) चोरी गेलेल्या किंवा नुकसान झालेल्या वाहनाबाबतीत नुकसान भरपाई देण्याचा अधिकार समितीकडे राहील व समितीचा निर्णय बंधनकारक राहील.

(८) वाहनधारकाने सायकलकरिता रु.३०, स्कूटर, मोपेडकरिता रु.६० व कार करिता रु. १२० **प्रतीमाह** शुल्क म्हणून ठेकेदारास द्यावे. त्याची पावती घ्यावी व ती जपून ठेवावी. अभ्यागतांसाठी शुल्क प्रतिदिन सायकल रु. २, स्कुटरकरिता रु. ५ व कारकरिता रु. १० राहील.

उपरोक्त वाहन शुल्क संस्थेतील कर्मचाऱ्यांना लागू नाही.

(९) विद्यार्थ्यांची वागणूक शिस्तबद्ध, योग्य व विनयशील असावी. संस्थेच्या उच्च परंपरेला यत्किंचितही धक्का लागेल अशी वर्तणूक करू नये. उदा. धुम्रपान, मादक पदार्थाचे सेवन, इत्यादी.

(१०) शिस्तीचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर संचालक योग्य ती कारवाई करतील. या बाबतीत संचालकांचा निर्णय अंतिम व विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

(११) विद्यार्थ्यांनी स्वत:जवळचे भ्रमणध्वनी (मोबाईल) वर्ग सुरू असतांना बंद ठेवावेत. वर्ग सुरू असतांना मोबाईल वाजल्यास तो सेट जप्त करण्यात येईल. तसेच विद्यार्थी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल.

(१२) विद्यार्थ्यांनी संस्थेशी संबंधित कोणतीही तक्रार लेखी स्वरूपात संचालकांकडेच करावी इतर कुठल्याही बाहेरील संस्था/संघटनेच्या मार्फत तक्रार करू नये. तसे केल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.



(१३) बेशिस्त विद्यार्थ्यांस दंडित करण्यात येईल. प्रसंगी अशा विद्यार्थ्यांचे नावे संस्थेच्या हजेरीपटावरून काढण्यात येईल.

(१४) **महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९ नुसार रॅगिंग केल्याचा आरोप सिद्ध झाल्यास संबंधित दोषी विद्यार्थ्यास २ वर्षेपर्यंत कारावास व रु. १०,०००/- पर्यंत दंड अशी शिक्षा होऊ शकते. त्याशिवाय त्या दोषी विद्यार्थ्यास महाविद्यालयातून किंवा संस्थेतून काढून टाकण्यात येईल व ५ वर्षेपर्यंत त्याला अन्य कोणत्याही महाविद्यालयामध्ये किंवा संस्थेमध्ये प्रवेश मिळणार नाही. त्यामुळे संस्थेत अथवा वसतिगृहात विद्यार्थी रॅगिंग करताना आढळल्यास त्याचे नाव तात्काळ संस्थेतून काढून टाकण्यात येईल. तसेच याप्रकरणी त्वरित एफ.आय.आर. दाखल करण्यात येईल व विद्यार्थी वरील शिक्षेस पात्र ठरेल.**

(१५) संस्थेतील आजी विद्यार्थी, विद्यमान अधिकारी व कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त, इतर व्यक्ती, संस्थेच्या आवारात/इमारतीत जास्त काळ आढळल्यास, त्यांची विचारपूस करून, आवश्यक असल्यास योग्य ती कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार संचालकांना आहेत.

(१६) संस्थेचे आवार, वर्गखोल्या, बगीचा व प्रसाधनगृहे यांची स्वच्छता राखणे ही प्रत्येक विद्यार्थ्यांची/विद्यार्थिनींची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे ह्याठिकाणी कचरा करणाऱ्यावर कारवाई केली जाईल.

**१५. पालकांना विशेष सूचना** (Special Instructions for Parents):

(१) पालकांनी कृपया विद्यार्थ्यांच्या उपस्थितीविषयीचे, देय शुल्काबद्दल व सामान्य शिस्तीचे नियम काळजीपूर्वक वाचावेत व त्यानुसार आपल्या पाल्याचे आचरण चांगले राहण्याविषयी अत्यंत दक्ष राहावे.

(२) संस्थेत घेतल्या जाणाऱ्या सर्व घटक परीक्षा व सत्र परीक्षांना उपस्थित असणे व प्रत्येक विषयात किमान ४० टक्के गुण मिळविणे विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असेल.

(३) विद्यार्थ्यांच्या उपस्थिती व प्रगतीविषयीचा आढावा पालकांनी घेणे आवश्यक आहे. या संबंधीच्या सूचना वेळोवेळी संस्थेकडून देण्यात येतात. त्याची पालकांनी दखल घ्यावी. कोणत्याही वर्गात किंवा प्रात्यक्षिकाच्या वर्गात सतत गैरहजर राहिल्यास पालकांनी तशी

लेखी सूचना संचालकास द्यावी, अन्यथ त्याच पुढील वर्गात उपस्थित राहू दिले जाणार नाही. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची व शैक्षणिक प्रगतीची सर्वस्वी जबाबदारी पालकांवर राहील.

(४) विद्यार्थ्यासंबंधी विवाद उपस्थित झाल्यास, संचालकांच्या नियंत्रणानुसार पालकांची उपस्थिती अनिवार्य आहे.

(५) वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी अधून-मधून अधीक्षक, वसतिगृह यांच्याशी संपर्क ठेवावा.

**टिप: आवश्यक वाटल्यास वरील माहिती मध्ये वेळोवेळी बदल करण्यात येतील.**

**डॉ. रामदास गो. आत्राम**
संचालक,
विज्ञान संस्था, नागपूर

" Good teachers make good Institute
Good Institute makes good students
Good students make good citizens &
Good citizens make good nation"